दिनांक : १० जून २०२१

मासिकांक ४



# “ती” चं पान

## तिच्या कडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखिका | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | सौ. सायली देशपांडे | ३ |
| २ | दोन शब्द | श्री. मनोज जैन | ४ |
| ३ | गेले ते दिन गेले....! | कु. भार्गवी बाबरेकर | ५ |
| ४ | अनमोल खजिना | सौ. मृण्मयी सारंग | ८ |
| ५ | संस्कारांची शिदोरी | कु. निर्मिती देवलसी | १० |
| ६ | मंतरलेले दिवस | सौ. तृष्णा खर्डेनवीस - आंबेकर | १२ |
| ७ | तान्ही शाळा | सौ. रेणुका देशपांडे - कुकडे | १९ |
| ८ | पत्रास कारण की...! | कु. प्राजक्ता बर्वे | २० |
| ९ | निरोप तिचा घेतांना... | कु. स्वर्णिमा प्रकाश | २३ |
| १० | “श” शाळेचा | सौ. सायली देशपांडे | २५ |
| ११ | शाळा व्यक्तिमत्व विकासाचे घर | सौ.अपूर्वा भालेराव | २७ |
| १२ | समारोप | सौ.सायली देशपांडे | ३१ |

# प्रस्तावना

कुठल्याही गोष्टीत जर सकारात्मकता असली तर ते काम अधिक उर्जा देतं याचा प्रत्यय या अंकाचं संपादन करतांना कायमच येतो.आणि म्हणूनच या अंकाचा चौथा अंक प्रकाशित करतांना अत्यंत आनंद होतोय. एखाद्या गोष्टीत जर सातत्य असेल तर त्याचा परिणाम हा सुखावह असतोच.

खरंतर या अंकाची संकल्पना डोक्यात आली तेव्हा त्याची वाटचाल ही सुखावह असावी अशी प्रांजळ इच्छा मनात होती. आणि त्याच इच्छेला माझ्या सगळ्या सख्यांनी आजपर्यंत उत्तम प्रतिसाद दिला. आणि याचा उल्लेख मी कायमच करील. कारण हे काय माझ्या एकटीचं श्रेय नाही.  हा अविरत चाललेला शब्दप्रवास त्यांच्या लेखणीला कायम  प्रवाहित करेल असा मला विश्वास वाटतो.

यंदाचा अंक हा शाळेच्या आठवणी जाग्या करणारा आहे.जिथून प्रत्येक व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. मातीच्या गोळ्याला आकार देण्याचं काम तिथे असलेले आपले गुरु शिक्षक या नात्याने करत असतात. याच विषयाला मध्यवर्ती घेऊन यंदाचा हा अंक.

अंकाच्या मुखपृष्ठापासून ते अगदी शेवटच्या पानापर्यंत अक्षय देशपांडे यांनी अंकाची  जी सुंदर बांधणी केली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. आणि दोन शब्द या मथळ्याखाली नागपूर आकाशवाणी येथील कार्यक्रम निर्देशक श्री मनोज जैन यांनी शब्दांच्या माध्यमातून जे मनोगत व्यक्त केलं त्यासाठी त्यांचे खूप खूप आभार.

याहून अधिक न बोलता या अंकाचा आपण नक्की आनंद घ्या. यात तुमचे सुद्धा शाळेचे काही अविस्मरणीय दिवस तुम्हाला स्मरतील अशी आशा आहे. तेव्हा “ती” च्या प्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी व्हा आणि प्रवासाचा आनंद घ्या…!

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द

‘ती’ च्या पानावर
‘’ती’’ चं अस्तित्व
‘ती’ चं सौंदर्य
‘ती’ च्या आशा आकांक्षा
‘ती’ ची वेदना
‘ती’ चं स्मित
‘ती’ ची धडपड
‘ती’ चं धैर्य
‘ती’ चे स्वप्न
‘ती’ ची भरारी
‘ती’ चं यश

‘ती’ च्या पानावर हे सर्व उमटायला हवं..पुरुषी अहंकारा पासुन स्वतः ला मुक्त करुन,समाजाच्या जुनाट आणि कालबाह्य चालीरितींना बाजुला सारुन ,आपल्या संपूर्णतेचा, प्रकृतिशी एकरुप होऊन आनंद घेत पुढे यायला हवं..हाच कदाचित ‘ती’ च्या पानाचा हेतु असावा.सायली पेशवे देशपांडेनी सुरु केलेला हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. सायलीचं वाचन अफाट आहे लिहिते पण छान त्यामुळे या पानाचं भविष्य उज्ज्वलच आहे.
नवोदित साहित्यकारांना हे एक उत्तम व्यासपीठ या निमित्ताने उपलब्ध झालं आहे. आपणा सर्वांना खूप खूप शुभेच्छा..

-श्री. मनोज जैन ,
कार्यक्रम निर्देशक,
आकाशवाणी ,नागपूर

# गेले ते दिन गेले ..!

दिवस किती चटकन् निघून जातात नं! त्या दिवशी मी माझी जुनी लिखाणाची वही चाळत असताना , त्यातल्या काही शब्दांनी मला रोखून धरलं. पानाच्या वरच्या बाजूला सवयी प्रमाणे लिहिलेली तारीख ओळखीची वाटत होती! मी त्या खालचा मजकूर वाचायला सुरुवात केली ;

' सोडूनी आज जातो
या ज्ञान मंदिराला '

हे शब्द मी वाचले आणि मी माझ्या शाळेच्या आठवणीत रमले....

दहावीच्या निरोप समारंभाच्या वेळी मी जे मनोगत व्यक्त केलं होतं , त्या मनोगताच्या सुरुवातीला मी या काही ओळी म्हटल्या होत्या. ते सगळं वाचलं आणि डोळ्या समोर उभं झालं ते निरोप समारंभाचं चित्र ! व्यासपीठावर स्थापन केलेलं विद्यादेवी सरस्वतीचं छायाचित्र , मानवी जीवनाला तिमिराकडून तेजाकडे नेणारी समई , मान्यवरांसाठी ठेवलेल्या खुर्च्या आणि त्याच्या बाजूला ' ज्ञानादेव तु कैवल्यम् ' असं ब्रीद मिरवणाऱ्या आमच्या शाळेचं वक्तापीठ ( पोडीयम).

समोर जमलेली विद्यार्थ्यांची गर्दी , सगळ्यांच्या चेहेऱ्यावर शाळा सोडून जाण्याचं दुःख होतं. शाळेच्या इतर सगळ्या कार्यक्रमांना हमखास गैरहजर असणारी टवाळखोर मुलंही आज उपस्थित होती. शिस्तीला थोडीशी शिथिलता होती ; कारण आजच्या नंतर शाळेचा गणवेष परिधान करून आम्ही कोणताच कार्यक्रम अटेंड करणार नव्हतो...आज जरी आम्हाला नेहमीच्या कडक शिस्तीत राहायचं नव्हतं , तरी सर्वत्र एक प्रकारची शांतता भासत होती....

त्या दिवशी आम्हाला आमच्या शाळेतला पाहिला दिवस आठवत होता. जेमतेम सहा वर्षांचे आम्ही , पाठीवर दप्तर आणि हातात टिफीन बॅग घेऊन शाळेचा जिना चढत होतो. काही मुलं रडत होती , आई बाबांना जाऊन बिलगत होती. पण आम्ही काही विद्यार्थी आमच्याच विश्वात होतो..! पहिला , दुसरा , तिसरा असं करत आम्ही नऊ टप्पे ओलांडले होते आणि दहाव्या पायरीवर येवून उभे होतो. इथून पुढे आमच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळणार होती. नवे शिक्षक , नवे मित्र , नवी जागा...म्हणून मनात थोडी भीती आणि दडपण होतं.

आमच्या शाळेची खास मानली जाणारी गोष्ट म्हणजे सुंदर , सुवाच्य हस्ताक्षर! त्यावर पहिली ते चौथी आमच्या शिक्षकांनी आमच्यावर घेतलेली मेहनत आणि त्यासाठी आम्ही खाल्लेला मार त्या दिवशी आवर्जून आठवत होता. कार्यक्रम टप्प्या-टप्प्याने पुढे जात होता . आम्ही सारेच भावूक झालो होतो. काही वेळाने माझं नाव घेण्यात आलं. मी हातात माईक घेवून उभी होते. घरून पूर्ण तयारी करून आलेली मी आता मात्र पूर्णपणे ब्लँक झाले होते. माझ्या मित्र मैत्रिणींना समोर बसलेलं बघून मला दाटून येत होतं. मी माझ्या भावनांना आवर घातला. दीर्घ श्वास घेतला आणि मनोगतला सुरुवात केली. आज मात्र माझ्या हातात कुठलाही कागद नव्हता ! मी सगळंच मनापासून बोलत होते. मला माझ्या आजूबाजला शांतता जाणवत होती. सगळ्यांच्या नजरा माझ्याकडे होत्या. त्या नजरांमध्ये भविष्यातली मोठी - मोठी स्वप्न साकार करण्याची धमक अन् पात्रता स्पष्ट दिसत होती ; शाळेच्या आठवणी झळकत होत्या आणि ' ज्ञानादेव तु कैवल्यम् ' हे ब्रीद प्रकाशमान करण्याची जिद्द चमकत होती.

मी बोलण्यास सुरुवात केली. माझा प्रत्येक शब्द हा माझ्या शाळेप्रतीची माझी कृतकृत्यता व्यक्त करणारा होता. आज मी जे काही आहे ते फक्त माझ्या शाळेमुळेच ! ही भावना क्षणाक्षणाला मनात घट्ट होत होती. मी बोलत होते...अगदी मनापासून !! बोलता बोलता सारे प्रसंग डोळ्यांपुढे उभे राहत होते. सहावीत असताना मी पहिल्यांदा काही तरी लिहिलं होतं. माझी पहिली कविता...! मला सुचतील तसे शब्द मी जुळवून ती कविता लिहिली होती. ती माझ्या वर्गशिक्षिकांनी वाचली. खरं तर त्या माझ्या कवितेला तात्पुरता छंद असं समजून सोडून देऊ शकल्या असत्या . पण त्यांनी मला प्रोत्साहन दिलं...प्रत्येक कवितेसाठी! एकदा त्यांनी मला एक विषय दिला. त्या विषयावर कविता लिहून आणायला सांगितली. कसं कोण जाणे पण आज पर्यंत , " तू अजून छान लिहू शकतेस...आणखी प्रयत्न कर." असं म्हणणाऱ्या आमच्या मॅडमनी कौतुकाने माझी पाठ थोपटली..! आणि तेव्हा पासून सुरु झाला माझा लिखाणाचा प्रवास...! पुढे त्या कवितेवर मला पुष्कळ बक्षिसं मिळाली. पण ती सगळी त्यांनी तेव्हा दिलेल्या प्रोत्साहनमुळे ! मी माझ्या मनोगताच्या शेवटापर्यंत येवून ठेपले. शेवटी मी स्व-रचित कविता सादर केली. खूप टाळ्या पडल्या. सगळ्यात शेवटी नेहमी प्रमाणे "जे चांगलं ते माझ्या सद्गुरुंचं आणि गुरुंचं ; जे चूक ते माझं" असं म्हणून मी सगळ्यांची रजा घेतली...माझ्या प्रत्येक कवितेला ,

माझ्यातल्या प्रत्येक कलेला माझ्या शाळेने नेहमीच प्रोत्साहन दिलं. पण माझ्या शाळेची विद्यार्थिनी म्हणून शाळेत मी माझी ही शेवटची कविता सादर करीत होते! आजचा दिवस आपला , आपल्या शाळेची विद्यार्थिनी म्हणून मान मिरवण्याचा शेवटचा दिवस आहे हे मला जाणवलं. या नंतर आपल्या नावा मागे आपल्या शाळेचं नाव लागणार नाही हे किती वाईट असतं हे त्या दिवशी खऱ्या अर्थाने जाणवत होतं.

कार्यक्रम संपला. आमच्या ज्युनियर्स नी आमच्यासाठी शुभेच्छा पत्रकं बनवली होती. ती त्यांनी आम्हाला दिली. शाळेची आठवण म्हणून शाळेने आम्हाला खाऊ आणि आयुष्यभराच्या प्रवासात पुरेल इतकी प्रेमाची अन् संस्कारांची शिदोरी सोबत दिली.

आता खऱ्या अर्थाने निरोपाचा क्षण आला होता. सगळ्या यार दोस्तांना टा-टा , बाय- बाय करण्याचा! आम्ही सगळेच शाळेबाहेरचं जग बघण्यास उत्सुक होतो पण हे शाळेत बनलेलं जग सोडून जाणं अवघड जात होतं. आम्ही आमच्या वर्गशिक्षिकांना नमस्कार केला आणि वर्गा बाहेर पडलो. एकमेकांचे घट्ट धरलेले हात सैल होण्याचं नाव घेत नव्हते! एकमेकांना मारलेली मिठी आणि त्या मिठीत पाझरणारे अश्रू मैत्रीची वीण अधिकच घट्ट करीत होते.

आमच्या शाळेने आम्हाला विचारांची प्रगल्भता दिली , ज्ञानाचा खजिना मुक्तहस्ते दिला. अवघ्या जगात स्वतः चं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याची आणि इप्सित यश साध्य करण्याची गुरुकिल्ली दिली. आमच्या शाळेने आम्हाला फक्त पुस्तकी ज्ञान न देता माणसाची पारख करण्याचीही नजर दिली! शाळेतून मिळालेल्या सगळ्या चांगल्या सवयी , चांगल्या गोष्टी मनात साठवत आम्ही शाळेच्या पटांगणा बाहेर आलो. आमच्यातला प्रत्येक विद्यार्थी शाळेला निरखून पाहत होता. डोळ्यात शाळेला साठवून घेत होता. आज पर्यंत अनेक डॉक्टर , वैज्ञानिक आणि कलाकारांना घडवणाऱ्या माझ्या ज्ञानमंदिराला वंदन करून मी घराची वाट धरली. डोळ्यात अश्रू आणि जड अंतःकरणासह मी चालत होते. मनात मात्र तेच शब्द घोळत होते...

" विठ्ठला शंकरानंदा |

नांदू दे जगती तव कीर्ती || "

- कु .भार्गवी बाबरेकर

# अनमोल खजिना

शाळा या दोन अक्षरात माणसाच्या आयुष्यातल्या सगळ्यात सुंदर आठवणी, चांगले संस्कार, जीवनाचा भक्कम पाया आणि मैत्रीचा खरा अर्थ दडला आहे. शाळा हा विषयच असा आहे की याबद्दल जितकं लिहिलं जितकं बोललं तितक कमीच असतं. प्रत्येकासाठी त्याची त्याची शाळा ही अगदी खास असते. मनाच्या एका कोपऱ्यात शाळा आणि तिच्या आठवणी यांनी एक खास आणि पक्क असं घर केलेलं असतं. आयुष्याच्या शेवटपर्यंत ह्या आठवणी कधी पुसल्या जात नाही. आणि या आठवणी अशा असतात की त्या जितक्या आठवावं तितक्या त्या ताज्या होत जातात. प्रत्येक वेळेला आपल्याला परत नवीन काहीतरी आठवत जातं आणि या खजिन्यात परत भर पडत जाते. लहान मुलांपासून ते म्हाताऱ्यांपर्यंत शाळा हा सगळ्यांचच अगदी जिव्हाळ्याचा विषय आहे.

लहानपणी सुरुवातीला शाळेत जायचं नसायचं म्हणून रडू यायचं आणि मोठेपणी आता शाळेत जाता येणार नाही म्हणून रडू येतं. काय गंमत आहे ना! 'माझी शाळा' हा निबंध हमखास परीक्षेत असतो. असं कोणीच नाही ज्यांनी ह्या विषयावर निबंध लिहिलेला नाही. शाळेत असतानाच शाळेबद्दल ची एक एक विण आपल्या नकळत मनात विणली जाते. आणि शाळा सोडून आयुष्यात पुढे वाटचाल करत असताना ती विण अधिकाधिक घट्ट होत जाते. शाळेशी प्रत्येकाची एक अनोखी नाळ जोडलेली असते जी कधीही तुटत नाही आणि जी कोणी ही तोडू शकत नाही. शाळेत निर्माण झालेली नाती ही अगदी मनापासून जोडलेली आणि तितकीच पवित्र असतात. त्यात कुठलेही हेवे-दावे, मतभेद, ईर्षा नसतात. ते खरं मनाने मनाशी बांधला नातं असतं.

शाळा म्हटली की नवीन दप्तर, नवीन गणवेष, नवीन वह्या, नवीन पुस्तक, नवीन डब्बा बॉटल ह्याची आठवण आल्याशिवाय राहत नाही. किंबहुना या सगळ्यां शिवाय शाळेच्या आठवणी थोड्याशा अपूर्णच वाटतात. त्या नवीन पुस्तकाचा सुगंध हा शाळेतच अनुभवायला मिळतो. लाडक्या मैत्रिणीसोबत घटकेत रुसवा घटकेत गोडी असं आंबट गोड नातं सुद्धा शाळेतच मिळतात. वय जसं वाढत जातं तसा तो निरागसपणा व्यवहारी जगात कुठेतरी हरवून जातो.

शाळेची ती घंटा वाजली की आपल्या वर्गाच्या रांगेत उभं राहून मोठ्या पटांगणात एका आवाजात शाळेची प्रार्थना म्हणण्याची मजा काही औरच. ते पहिल्या बाकावर बसण्यासाठी भांडणं, आवडत्या शिक्षकाच्या तासाला अगदी मन देऊन लक्ष देणे, स्वाध्याय पुस्तक पूर्ण करण, आपल्या आवडत्या शिक्षकांनी छोट्याशा गोष्टीवरून का होईना पण आपला कौतुक केलं की ऑस्कर जिंकल्याचा आनंद होण हे सगळे अनुभव आपल्याला शाळेत अनुभवायला मिळतात.

शाळेला ज्ञानमंदिर ही म्हणतात. ती अशी एकमेव जागा असते जिथे आपल्याला बौद्धिक, शारीरिक, मानसिक सगळ्या विषयाचे ज्ञान मिळतं. आपल्या सुप्त गुणांना तिथेच वाव मिळायला सुरुवात होते. आणि पुढे तेच गुण आपल्याला या जगात जगायला मदत करतात. या बाहेरच्या जगातल्या दुनियादारी पासून अगदी लांब नेत आपलं स्वतःचं खरं निरागस व्यक्तिमत्व जगायला आपल्याला शाळा शिकवते. शाळेत कोणीही गोरं-सावळं नसतं, ठेंगणं किंवा उंच नसतात, गरीब-श्रीमंत नसतात. तिथे असतो तो फक्त आपलेपणा. आपली जिवाभावाची माणसं, जीवाला जीव लावणारे मित्र-मैत्रिणी. शाळा सुटल्यानंतर जेव्हा जेव्हा शाळेचा विषय निघतो तेव्हा त्या आठवणींनी आपला ऊर भरून येतो.

ही माझी शाळा, हे माझे शिक्षक हे सांगताना आपली कॉलर नेहमीच टाइट होते. जर बाहेर कुठे आपल्याला आपले शिक्षक दिसले तर आपल्या मुलांना हे माझे शिक्षक आणि यांनी मला शिकवलं हे सांगताना जो आनंद मिळतो तो जगात कुठल्याही गोष्टीने मिळत नाही. आणि त्यात जर शिक्षकांना आपलं नावही लक्षात राहिलं तर मग विचारूच नका आनंदाला पारावाच नसते. शाळेतला प्रत्येक दिवस म्हणजे एक सुंदर रंगलेली मैफिल असते जी परत परत ऐकावीशी वाटते . “ही आवडते मज मनापासुनी शाळा लाविते लळा ही जसा माऊली बाळा". ही कविता शाळेत प्रत्येकांनी पाठ केलेली. पण या कवितेचा खरा अर्थ, खरा भाव आपल्याला शाळा सोडून गेल्यानंतर कळतो.शाळा हा आपल्या आयुष्यातला असा एक अमूल्य खजिना आहे की जो कायमच आपल्याला श्रीमंत करत जातो, जो कधीही संपत नाही. हा खजिना कधीच चोरीला जात नाही उटल प्रत्येक आठवणी सोबत ह्यात भरच पडत जाते.

- सौ. मृण्मयी सारंग

# संस्कारांची शिदोरी

विद्या मिळविण्याची लालसा मनात असणारा व ती मिळविण्याची सतत धडपड करणारा तो विद्यार्थी ,

तो ज्ञानार्थी !

शाळा हे माणसाने माणसाला स्वत:विषयी जागृत करून आदर्श नागरिक बनविण्याचे माध्यम होय . शाळेपासूनच आपले प्राथमिक शिक्षण चालू होते . शाळा ही आपल्या मूळ शिक्षणाचा भक्कम पाया होय . जिथे आयुष्याची जडणघडण होते , जिथे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो , ती शाळा .

खरं तर , कावडीतून आई-वडिलांना काशीला घेऊन जाणारा श्रावणबाळ , आई वडिलांचे पाय चेपताना साक्षात परब्रह्म आला तरी त्यांना तिष्ठत ठेवणारा पुंडलिक , गुरु द्रोणाचार्य यांना आपल्या हाताचा अंगठा कापून देणारा एकलव्य , गुरूच्या आज्ञेवरून बांधावर आडवा पडणारा अरुणी , हे सर्व आदर्श आपल्याच मातीतले . विद्यार्थी कसा असावा याची ही सगळी उत्तम उदाहरण आहेत.

पूर्वीच्या काळी गुरुकुल पद्धती होती मात्र इंग्रजांच्या राजवटीतून गुरुकुल पद्धतीचे रूपांतर शाळेमध्ये झाले . ज्यावेळी विद्यार्थी ज्ञान साधना करत असतो त्या वेळी त्याच्यावर शैक्षणिक , सामाजिक , राजनैतिक , शिस्त , अनुशासन या साऱ्या वातावरणाचे संस्कार त्याच्यावर होत असतात व ते संस्कार शाळेत द्वारे दृढ होतात . कारण विद्यार्थी हा त्याचा सर्वाधिक काळ शाळेत घालवत असतो .

शाळेतील अभ्यासात एखाद्याला एखाद्या विषयात अपयश आले की , अगदी सहजगत्या म्हटले जाते की त्यांचा पायाच कच्चा आहे . पाया ठीक नसेल , भक्कम नसेल तर इमारत कोसळणारच ! म्हणून पाया पक्का असणं महत्त्वाचे आहे. प्राथमिक म्हणजेच , शालेय शिक्षणाचे महत्व व्यक्तीमत्वाला समर्थपणे जीवन जगता यावे म्हणून तिला लिहिता-वाचता येणे , काही किमान कौशल्य अवगत असणे आवश्यक असते . जीवन कसेही जगण्यात अर्थ नाही. ते आनंदानेच जगता यायला हवे.

त्यासाठी विचारशक्ती , कल्पनाशक्ती , संवेदन शक्ती , इत्यादी मानसिक गुणांची वाढ व्हावी लागते , अभिरुची विकसित व्हावी लागते . या सगळ्याचा पाया बालपणातच घालता येतो . बालपणी जे संस्कार होतात तेच आयुष्यभर टिकतात. म्हणजेच बालपणातील संस्कारावर व्यक्तिमत्व अवलंबून असते ; म्हणून शाळा ही खूप महत्त्वाची ठरते . आज केवळ आई-वडील , कुटुंब , एखादी व्यक्ती कोणत्याही विद्यार्थ्याला घडवू शकत नाही , त्याला घडवतो तो संपूर्ण समुदाय आणि म्हणूनच शाळा आणि समाज हे दोन्ही अधिकाधिक महत्त्वाचे होत जात आहे .

एक वेळ डॉक्टर-इंजिनिअर होणे सोपे परंतु शिक्षक होणे हेच सर्वाधिक जोखमीचे आणि कठीण असते . कारण शिक्षक हा केवळ वर्तमानातील विद्यार्थी घडवत नसून तो भविष्यातील डॉक्टर-इंजिनियर आणि विविध क्षेत्रातील विद्यार्थी घडवत असतो . म्हणून शिक्षकांचा आदर हा नेहमी असायलाच हवा . कारण शिक्षक हा माणसाला सन्मानाने वागणारा , समानतेने वागणारा सुजाण नागरिक बनवितो ! आणि हे सारे त्या शाळे मुळेच शक्य होते .

शाळा आपल्याला 'माझे बालपण' येथून

'तुझं आहे तुजपाशी। परी तू जागा चुकलासी ॥ ' ह्याची जाणीव करून देऊन ' केल्याने होत आहे रे ! आधी केलेची पाहिजे॥ ' हे शिकविते आणि तेथून ' राष्ट्रगीताची कहाणी '

आपल्या मनात रुजवून ' यशस्वी विद्यार्थी ' बनविते ' राष्ट्रीय एकात्मते ' कडून 'सर्वधर्मसमभाव ' मनात साठवून

' एकविसाव्या शतकाचे आव्हाने ' स्वीकारण्यासाठी समर्थ बनविते आणि म्हणून शाळा ही संस्करांची परिपूर्ण अशी शिदोरी आहे .

- कु. निर्मिती रा. देवलसी

# मंतरलेले दिवस......

पार्सल घेऊन शमिका  दुकानातून बाहेर पडली, आणि गाडीला बॅग लावत असतानाच समोरून येणाऱ्या चैतालीकडे तिची नजर गेली, चैताली आत्ताही अगदी तशीच दिसत होती जशी शाळेत असताना दिसायची, पाठीवर मोकळे सोडलेले काळेभोर लांब केस,आणि टपोऱ्या-बोलक्या डोळ्यांची चैताली शाळेत असताना स्कॉलर मुलांच्या रांगेत नेहमीच उठून दिसायची,पण बऱ्याच वर्षांनी पाहात असल्याने नक्की ही तीच आहे ना असा विचार करून शमिकाने घाबरतच आवाज दिला

"ए....हाय...तू चैताली ना?... ओळखलं का मला?.." शमिकाने विचारलं..

"यू आर शमिका, राइट?"

चैताली म्हणाली..

शमिकाने हसून होकारार्थी मान हलवली..

शमिकाने विचारलं

"पण तू इथे कशी ?" ,

"तेच मी ही विचारणार होते की तू इथे कशी ?"

चैताली म्हणाली..

"अगं मी इथल्या डॉमिनोजमधे आले होते, मुलीसाठी पिझ्झा ऑर्डर केला होता ना तो घ्यायला, आणि तू?"

शमिका म्हणाली.

"अगं इथे वरतीच माझी ॲकेडमी आहे,11th,12th आणि NEET चे क्लासेस घेते मी"

चैताली सांगत होती..

"काय सांगतेस?, ही ॲकेडमी तुझी आहे याची मला कल्पनाच नव्हती,नाहीतर तुला भेटायला नक्कीच आले असते ,कारण मी तर इथे नेहमीच येते"

शमिका म्हणाली..

" चल ना मग माझी ॲकेडमी दाखवते तुला"

चैताली म्हणाली..,

असं म्हणून दोघी जिन्याच्या दिशेने जात होत्या,

"शाळेत असताना तू,मीनल,शुभम आणि चैतन्य तुम्हा स्कॉलर मुलांचा वेगळाच ग्रुप होता ना गं..ते सगळे कुठे असतात ?" शमिकाने विचारलं

"अगं मीनल तर माझ्यासोबत माझ्याच अॅकेडमीत काम करते आणि NEET चे क्लासेस शुभम आणि मी दोघंही घेतो" चैतालीने सांगितलं,

"आणि चैतन्य..?"

शमिकाने विचारताच विषय बदलवत चैताली म्हणाली, "कित्तीऽऽ वर्षांनी भेटतोय आपण..,,पण तू मला ओळखशील असं वाटलंच नव्हतं..

"अगं न ओळखायला काय झालं, शाळेत यायला सुरुवात केली त्यादिवसापासून तर १०वीच्या रिझल्टच्या दिवसापर्यंत आपण सगळे सोबत होतो ना , इतक्या वर्षांची आपली ओळख कसं कोणी विसरू शकणार..?" शमिका म्हणाली..

बोलता-बोलता चैतालीने दरवाजा उघडला आणि आत येण्याचा इशारा केला..आत जाताच मोठमोठ्या क्लासरूम्स बघून शमिका थक्क झाली..

"किती मुलं असतात गं एका बॅचमध्ये" शमिकाने विचारलं..

"३५-४० तरी असतातच" चैताली म्हणाली..

बोलता-बोलता चैतालीने शमिकाला पूर्ण ॲकेडमी, तिथला स्टाफ, ॲकेडमीतले टॉपर विद्यार्थी, त्यांच्या अचिव्हमेंट्स सगळ्याची माहिती दिली.. शमिका सगळं खूप कौतुकाने पाहत होती..

तितक्यात मीनलही तिचा क्लास संपवून आली , शमिकाला इतक्या वर्षांनी बघून तिलाही धक्का बसला,पण इतक्या वर्षांनी पुन्हा भेटल्यावर आनंदही झाला होता.. चैताली म्हणाली "आपण एक काम करूया का,आज रात्री माझ्या घरी थांबूया म्हणजे निवांत गप्पा करता येतील.."

शमिका माहेरी आली असल्याने तिने भावाला कळवले की बऱ्याच वर्षांनी जुन्या मैत्रिणी भेटल्यात त्यामुळे रात्री तिकडेच थांबण्याच ठरतंय, शुभम(मीनलचा नवरा) मित्रांसोबत जाणार असल्याने मीनलनेही घरी सासुबाईंना ती रात्री मैत्रिणीकडे राहणार असल्याचे कळवले.. आणि शमिकाची खूप जवळची मैत्रीण सानिका जी यांच्यासोबत शाळेत होती तिलाही यांनी बोलवून घेतले..मग काय रात्रभर नुसत्या गप्पांना ऊत आला होता.. शमिका म्हणाली..

"मला अजूनही शाळेचा पहिला दिवस आठवतो, आईने सांगितले होते मला की मी आणि सानिका तर पहिल्या दिवशी पूर्णवेळ शाळेच्या गेटजवळच रडत उभं होतो.. नंतर आठ दिवसांनी वर्गाजवळ जाऊन उभं राहू लागलो आणि नंतर हळूहळू आत जायला लागलो.. त्यातही मॅडमनी सांगितलं की मी अर्ध्यापेक्षा जास्त वेळ खिडकीत उभं राहून आईची वाट पाहत राहायचे आणि सानिका तर मधल्या सुट्टीनंतर शाळा संपेपर्यंत डबाच खात असायची, असं करता करता वर्ष तर संपलं पण माझी तासनतास खिडकीत उभं राहण्याची सवय काही सुटली नाही..मग पहिलीत गेल्यावर एक दिवस साने मॅडमनी वर्गातल्या खिडकीच्या समोर असलेले झाड दाखवले आणि त्यादिवसापासून माझं खिडकीत उभं राहाणं बंद झालं.."

सानिका म्हणाली ..

"शमिका, तू आणि मी ,आपलं तर वर्गात बसल्यावरही बरेच वेळा लक्ष बाहेरच असायचं गं, आठवतं का आपण २रीत-३रीत असू तेव्हा एकदा मॅडम वर्गात गणित शिकवत होत्या आणि त्याचवेळी मोठी मुलं ग्राऊंडवर फुटबॉल खेळत होती, माझं पूर्ण लक्ष त्यांच्या खेळण्याकडेच होतं, मॅडमनी मला प्रश्न विचारला त्यावेळी मी बाहेरच्यांच्या खेळात इतकी एकरूप होऊन गेली होती की मला मॅडमनी विचारलेला प्रश्न ऐकायला आलाच नाही, आणि हे माझं नेहमीच होत असल्याने मॅडमनी चिडून समोरच्या बेंचवर जोरदार डस्टर आपटला आणि त्या अचानक झालेल्या आवाजाने दचकून मी वर्गातच मोठ्याने रडायला लागली

तेव्हा पासून मॅडमनी मला मधल्या बेंचवर तेही त्यांच्या नजरेसमोर बसवायला सुरुवात केली होती.."

चैताली म्हणाली "मी तर पहिल्या  दिवशी आई आपल्याला शाळेत एकटीला सोडून जाते हे कळताच घरी गेल्या गेल्या ताप काढला होता आणि माझा ताप पाहून घरचे सगळे घाबरले होते,त्यानंतर माझं शाळेत जाणं महिनाभर बंदच होतं ,शाळेचं नाव काढलं तर मी लगेच ताप काढायचे.पण शाळा सुटल्यावर मॅडम रोज सगळ्यांना चॉकलेट देतात हे जेव्हा कळलं तेव्हा चॉकलेटच्या ओढीने मी नियमितपणे शाळेत जायला सुरुवात केली.."

सानिका म्हणाली "शाळेतल्या त्या चॉकलेटची सर आजच्या bournville चॉकलेटलाही येणार नाही"..

"अगदी खरंय.. आणि तो शाळेच्या बाहेर उभा राहाणारा फिंगरवाला आठवतोय का गं,१रूपयात १०फिंगर्स द्यायचा तो आपल्याला,ते दहा फिंगर्स दहा बोटांत अडकवायचे आणि गेटपासून वर्गात जाइस्तोवर आरामात संपवायचे,१० मिनिटांच्या ब्रेकमध्ये आपण सगळे कित्ती गर्दी करायचो ना त्याच्या ठेल्याजवळ, कधी कधी तर फिंगर घेण्याच्या नादात ब्रेक संपल्यावर जी बेल वाजवली जायची ती सुद्धा ऐकू येत नव्हती, शेवटी सायकल स्टॅंडवाले काका जोरात शिटी वाजवून 'आत व्हा' असा इशारा करायचे तेव्हा लक्षात यायचं की ब्रेक संपलाय आणि मग तिथून धावत सुटायचो ते थेट वर्गात जाऊनच थांबायचो.." चैताली बोलत होती..

तेवढ्यात सानिकालाही काहीतरी आठवलं तसं लागलीच..

"ए..ए... आणि तो 'दिलरूबा आइसगोलावाला' ,तो आठवतो का गं, वार्षिक परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या दिवशी दरवर्षी आपण सगळ्या आइसगोला खायला जायचोच त्याच्याकडे..

"हो हो.. मलाही आठवतंय, एकदा तर त्याच्याकडचा आइसगोला खात असताना आपल्या वर्गातल्या धीरज आणि सुमंतनी आपल्याला  पाहिलं आणि तेव्हा पासून ते आपल्याला '"आइसगोऽऽला कोकाकोऽऽला"' असं चिडवायचे.कारण आपण सगळ्यांनी एकसारखा कोकाकोला फ्लेवरच घेतला होता.

"मीनल सांगत होती..

हे ऐकून चौघीही खूप हसल्या.. "मला वाटतं त्यावेळलो आपण ८वीत होतो"

शमिका म्हणाली..

"तुम्हाला माहितीये ९वीत असताना एकदा या धीरज आणि सुमंतनी मिळून 'ब' सेक्शनमधल्या कोमल नावाच्या मुलीचा वॉकर तोडला होता, तिला पोलिओ झाला होता त्यामुळे ती वॉकर घेऊनच चालायची आणि या दोघांनी गमतीगमतीत खरोखरच तिचा वॉकर तोडला,ती बिचारी 'आता मला चालताच येणार नाही' या विचाराने हताश होऊन रडत होती ,मग शाळा सुटल्यावर राजे सरांनी तिची घरी जाण्याची सोय केली आणि मग या दोघांनी सरांच्या हातचा बेदम मार खाल्ला होता,त्यानंतर चार दिवस ते दोघंही शाळेत आलेच नव्हते तेव्हा यांना शाळेतून काढले की काय अशी भिती सगळ्यात पसरली होती कारण त्याआधीही दोघांनी मिळून बरीच कारस्थान केली होती..पण नंतर झालं गेलं सगळं विसरून ते दोघं दांडगाई करण्यासाठी पुन्हा तयारच होते" मीनल म्हणाली..

"मला तर गॅदरिंगचे दिवस जवळ आले की खूप आनंद व्हायचा कारण वेगवेगळ्या स्पर्धा, डान्स, नाटक यांच्या प्रॅक्टिससाठी मॅडम दुसऱ्या विषयाच्या शिक्षकांचा तास सुरू असताना खास परवानगी घेऊन वर्गातून बोलवून न्यायच्या तेव्हा बाकीच्यांना अभ्यास करावा लागतोय आणि आपण यातून तात्पुरते का होईना सुटलोय याचा आनंद अवर्णनीय असायचा.."

सानिका सांगत होती.. "गॅदरिंगच्या चार दिवस आधी कसून रंगीत तालीम व्हायची, त्यावेळी शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्यावर कुठली न कुठली जबाबदारी सोपवली जायची, कुणी प्रत्यक्ष सादरीकरण करायचे, कुणी बॅकस्टेज सांभाळायचे, कुणाकडे वॉलेंटियरशिप असायची, शाळेतील प्रत्येकजण त्या समारंभात आनंदाने सहभागी व्हायचे.. खूप छान वाटायचं तेव्हा"...

"अगं ७वीत असताना आपण कोळी नृत्य केलं होतं, तेव्हाचा प्रसंग आठवतो का..? आपल्या वर्गातल्या त्या हेरंबची लुंगी डान्स करता करता सुटली होती, किती लठ्ठ होता गं तो"

शमिकाने त्या प्रसंगाची आठवण काढत सगळ्यांना पुन्हा एकदा हसवलं होतं..

"हो आणि तेव्हा डान्समधे माझी पेअर शुभम सोबत न लावता मॅडमनी दुसऱ्या मुलासोबत लावल्यामुळे शुभमला खूप राग आला होता,तो तर डान्स करतच नाही म्हणाला पण चैताली आणि शमिकानी समजावलं म्हणून कसाबसा तयार झाला, आणि तेव्हापासून शुभमला मी आवडते हे सगळ्यांनाच कळलं होतं" मीनलनी सांगितलं..,

सानिका सांगत होती..

"त्यानंतर ९वीत असताना गर्ल्स टॉयलेटच्या बाहेरच्या भिंतीवर कुणीतरी हार्ट शेपमधे चैतन्य+चैताली असं लिहून ठेवलं होतं,ते कळल्यावर तर चैतन्य इतका डिस्टर्ब झाला होता,ते पाहून सगळ्यांना वाटलं की हे चैतन्यनेच केलंय त्यामुळे तो घाबरलाय पण खरं कारण तर वेगळं होतं त्याचं चैतालीवर मनापासून प्रेम होतं, पूर्ण शाळेत या विषयावर खूप चर्चा झाली, चैताली सुध्दा या गोष्टीमुळे थोडी डिस्टर्ब झालीच होती,त्यावेळी देशपांडे मॅडम आणि राजे सरांनी खूप काळजीपूर्वक ते प्रकरण हाताळलं होतं आणि यापुढे असे प्रकार घडू नये यासाठी सक्त ताकीद दिली होती.."

"हो गं",

मीनल बोलू लागली..

"त्यानंतर १०वीच्या वर्षी चैतन्य आणि चैताली सुरवातीला बरेच दिवस शाळेत रेग्युलर नव्हते, शाळा सुरू होऊन बरेच महिने झाल्यानंतर याविषयीची कुजबुज देशपांडे मॅडमच्या कानावर आली तेव्हा त्यांनी दोघांनाही नीट समजावले आणि पूर्वीप्रमाणे अभ्यास करून शाळेत अव्वल येण्याचं वचन त्यांच्याकडून घेतलं तेव्हा कुठे हळूहळू सगळं पूर्ववत होऊ लागलं, आणि मॅडमना दिलेल्या शब्दाला जागत चैताली आणि चैतन्य आपल्या शाळेतून अव्वल येण्यात यशस्वी ठरले, त्यावेळी त्यांचा शाळेत सत्कार करण्यात आला होता तो दोघांचा सोबतचा फोटो अजूनही मी जपून ठेवलाय.."

हे सगळं बोलणं सुरु असताना चैताली आतून बाहेर येत म्हणाली..

"शिक्षणात तर आम्ही नेहमीच यशस्वी होत आलोय गं आणि यापुढेही होऊ पण....असो..,आमचं हे स्वप्न पूर्ण होऊ शकलं नाही तरी ज्यासाठी तो मला सोडून इतक्या लांब विदेशात गेलाय ते त्याच डॉक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण व्हायला हवं इतकंच वाटतंय.."

मीनल म्हणाली..

"लवकरच तुमचं हे स्वप्नही पूर्ण होणारंय, आणि तुम्हाला तुमचं प्रेम,ते जुने दिवस पुन्हा एकदा एकमेकांच्या सोबतीने अनुभवता येणारेत,नव्या आयुष्यात तुम्ही सुंदर क्षणांचे साक्षीदार ठरणारच आहे गं, पण ते शाळेचे ते दिवस पुन्हा अनुभवता येऊ शकणार नाहीत, किती छान दिवस होते गं ते, किती मज्जा करायचो आपण,ते अविस्मरणीय क्षण आपल्याला एखाद्या अनमोल रत्नाप्रमाणे आठवणींच्या रूपात कायम आपल्या मनाच्या तिजोरीत जपून ठेवायचेत,कारण...

सोबतीस असता त्या आठवणी,स्वप्नात हरवती साऱ्या जणी

खरोखर रम्य किती त्या आठवणी,होतसे सोनेरी क्षणांची उजळणी..

कधी ताडीती,कधी तारीती, परी करीती मायाही फिरुनी

धन्य जाहली त्यांची शिकवणी,मस्तक झुकती तयांच्या चरणी..

खरोखर रम्य किती त्या आठवणी,होतसे सोनेरी क्षणांची उजळणी...

होतसे सोनेरी क्षणांची उजळणी....

- सौ. तृष्णा खर्डेनवीस आंबेकर

# तान्ही शाळा

Online/virtual शाळा सुरू झाल्या आणि माझाही दाखला तुझ्या घरबसल्या शाळेत झाला. मी आतापर्यंत शिक्षण घेतलेल्या शाळा कॉलेजपेक्षा मात्र तुझी ही शाळा सर्वस्वी निराळी. इथे दंगामस्ती करायला तू प्रोत्साहनच देतोस. शिक्षा आणि शाबासकी दोन्ही म्हणून तू साखरपाप्यांची खिरापत वाटतोस. नियमबाह्य वर्तन केले तर बोबड्या बोलांनी अगम्य भाषेत खडसावतोस. जगावेगळी तुझी शाळा आणि जगावेगळे त्यातले शिक्षण! आई बाळाची पहिली गुरू, म्हणून तिची महती सर्वांना ठाऊक असते, पण तान्हूलं बाळं आईला काय काय शिकवतं, ते मला तुझ्या इटुकल्या गोंडस शाळेत प्रवेश घेऊनच कळलं. तुझ्याही नकळत आई कडून किती धडे गिरवून घेतलेस!

बघण्याआधी सुद्धा कुणाच्या प्रेमात पडता येऊ शकतं, हे मला तुझ्या पहिल्या चाहुलीने शिकवलं.

एकाच शरीरात धडधडणारी दोन हृदयं, असं अनोखं नातं निभवायला शिकवलं.

अवघडलेलं गर्भारपण,जीवघेण्या बाळंतकळा, दिवसभराची दमछाक, रात्रीची जागरणं हे सगळं तुझ्या एका हास्याने विसरायला शिकवलं.

आई म्हणजे विश्वासाची आणि विसंबून राहण्याची परिसीमा, हे दाखवून दिलं.

माझ्या कुशीतला स्वर्गाचा तुकडा जपताना माझ्यात किती संयम आहे, हे माझं मलाच जाणवून दिलं.

माझं अस्तित्व किती आश्वासक आहे, ते मला शोधत भिरभिरणाऱ्या तुझ्या नजरेनी सांगितलं.

माझ्या गळ्याभोवती गुंफलेल्या तुझ्या मिठीने अमूल्य दागिना मला बहाल केला.

मी निसर्गाच्या चमत्कृतीचा भाग झाले. तुझी आई, तुझं घर होऊ शकले, त्याबद्दलची कृतज्ञता शिकवली.

मलाच अगदी नवखं आणि तरीही जणू चिरपरिचित असं ममत्व दिलंस. प्राणापलीकडे प्रेम करायला शिकवलं.

एक ना दोन, असंख्य तऱ्हेच्या उदंड शिकवणी दिल्यास. मी तुला जन्म दिला आणि तू मला जन्माचं देणं.

- सौ. रेणुका देशपांडे- कुकडे

# पत्रास कारण की...

प्रिय विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो,

मी तुमच्या जिवाभावाची, तुमच्या मनाच्या अगदी जवळची, अशी शाळा बोलतेय. कसे आहात तुम्ही सगळे? खरं तर आपली ओळख हल्लीची आहे असं नाही बरं...

अगदी पिढ्यान् पिढ्यां पासून चालत आलेली आपली ओळख. अगदी सुरूवातीला जेव्हा भारतात गुरु शिष्य परंपरा होती तेव्हा मला गुरूकुल म्हणंत, काळ बदलला आणि माझं रूपांतर शाळेत झालं.

तुम्हा सर्वांच्या सर्वांगीण विकासाचे साक्षीदार फक्त तुमचे पालकंच नाही बरं तर मी पण आहे... अगदी दुडुदुडु धावणाऱ्या बालक वर्गातील मुलांपासून ते मिसरूड फुटु लागलेल्या young adult पर्यंतचा प्रवास, निर्जीव असले, तरी मीही अनुभवलाय,

सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय..... ते अगदी पहला नशा पहला खुमार पर्यंतच्या तुमच्या प्रवासाची मीही मुक साक्षीदार आहे. शेवटच्या बाकावर बसून तुम्ही वर्ग चालु असतांना खाललेले डबे, बाई महत्वाचं गणीत शिकवत असतांना तुम्हाला लागलेली डुलकी, बाई सुट्टीवर असतांना तुम्ही केलेला कल्ला, परीक्षेच्या वेळीस उडालेली तुमची तारांबळ, पटांगणात खेळलेले खेळ..... अगदी सगळं कसं काल घडल्या सारखं लख्खं आठवतंय मला....

तुम्हाला खरं सांगु का उन्हाळ्याची किंवा दिवाळ्याची सुट्टी लागली ना की मला मेलीला करमायचंच नाही.... तुमच्या आवाजानी दुमदुमणारा परिसर कसा अगदी सुना सुना होऊन जायचा.... माझे डोळे लागून रहायचे ते जून महिन्या कडे.... कधी माझी लेकरं येतायत आणि आपल्या हसण्या रडण्याच्या आवाजांनी मला प्रसन्न करतायत... अस्सं व्हायचं मला....

दर वर्षी मार्च महिन्यात एक batch आपल्याला सोडून जाणार याचं आतोनात दुःख व्हायचं मला..... पण परत जुन महिन्यात ईवल्या ईवल्या पावलांचा प्रवेश व्हायचा आणि कित्तीही म्हातारी मी झाले तरी त्या पावलांच्या येण्यानी माझ्यात नवीन आशा नवीन ऊर्जा यायची...

असाच 2020 महिन्याचा मार्च चालू झाला.... मी दहावीच्या पोरांना निरखून पाहू लागले.....पाखरांची, घरटं सोडून उडायची वेळ जवळ आली होती... पण एक दिवस अचानक कोणी ईकडे येईनासंच झालं.... दारावरच्या शिपायाला बोलतांना ऐकलं की काहीतरी महामारी आलीये आणि त्यामुळे अनिश्चित काळा पर्यंत शाळाच बंद राहणार....... चर्र झालं माझ्या मनात, डोळे पाणावले, जीव अगदी मेटा कुटी ला आला....असं वाटलं संपलं सगळं, वाटलं की कोणी माझा श्वासंच माझ्या पासून वेगळा करतंय. काही दिवस असेच गेले, मला अगदी निराश वाटंत होतं. मग एके दिवशी माझ्या कानावर परंत काही शब्द पडले, मला आता रोज सुगंधित साबणानी आंघोळ घालणार आहेत असं मला कळलं....माझी साफ सफाई अगदी जोमात चालू झाली, परत आशेचा किरण मला दिसू लागला आणि काही दिवसात मोठी मुलं आली सुध्दा, पण... पण माझा हा आनंद एक महिना सुध्दा टिकला नाही...परत त्या विषाणू चा असर वाढू लागला.... परत मला बंदिस्त झाल्या सारखं वाटू लागलं.... झालं... माझे डोळे आपले कायम main gate कडे...... आज जवळपास वर्ष झालंय.... मी अजूनही आशेने वाट पहात बसलेय.....असं वाटतं आत्ता शिपाई दार उघडेल आणि सगळी बच्चे कंपनी धावत धावत आत येतील..... खरं तर मन हळू हळू खचंत चाललंय, तुमच्या नसण्यानी ते सैरभैर होतंय, आता तर मी पण तुमच्या साठी अगदी mask सुध्दा लावायला तयार आहे.

परवा तर मुख्याध्यापिका म्हणल्या काही मुलांना online का काय ते शिक्षण आवडतंय सुध्दा....पण मुलांनो....ते खरं शिक्षण नाही हं... ती तडजोड आहे हे कायम लक्षात ठेवा..... तुम्ही इथे चुकाल, पडाल धडपडाल..... पण तुमच्या पंखात त्यानीच बळ येणार आहे..... तुमची मस्ती, एकत्र डब्बा खाणं, अभ्यास करणं, एकमेकांना भेटणं हे सगळं सगळं तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे रे.....

आता इतक्या पिढ्यांना मी घडतांना पाहिलंय ना की तुम्हा सर्वांचं जडण घडण पहाण्या साठी मी आतूर झालेय.... ईश्वराचरणी एकंच प्रार्थना आहे.... ती जी काही महामारी आहे ना ती लवकर संपू देत..... तुमच्या शिवाय माझ्या असण्याला काहीच अर्थ उरंत नाही रे बाळांनो.... लवकर लवकर शाळेत या.

पुन्हा भरू दे सभा अंगणात

पुन्हा उघडू दे डबा खाऊचा

ताण तणाव नकोच आता

होऊ देत जल्लोश आनंदाचा

पुन्हा येऊ देत हास्याचे आवाज

पुन्हा होऊ देत घंटा नाद

या वेळेस या असे की

त्रास द्यायची काय होईल कोरोनाची बिशाद

लवकर या रे मुलांनो आता आवरंत नाही स्वतःला...

तुमचीच,

शाळा

- कु.प्राजक्ता बर्वे

# निरोप तिचा घेतांना....

तिचा निरोप घेतांना, तिला शेवटचं बघतांना डोळे अश्रूंनी डबडबतील , कंठ दाटून येईल असं मला कधीच वाटलं नव्हतं!

खरंतर मी तिला पहिल्यांदा भेटले ना तेव्हाही डोळ्यात अश्रू होतेच..पण पहिल्या भेटलीतले अश्रू आणि शेवटच्या भेटीतले अश्रू यात जमीन अस्मानाचा फरक होता. पण एक गोष्ट मात्र एकदम सारखी होती..मनातली भिती आणि पोटातला गोळा; तो दोन्ही वेळेला होता!

तिच्यासोबत दिवसभर राहायचं आणि तेही आई शिवाय..! ही कल्पनाच फार भयानक होती. पण तिनी शंभर टक्के प्रयत्न केले मला तिच्यात सामावून घेण्याचे. तिच्या सोबतीची सवय मला हळू हळू झाली. मग काय तिच्या सहवासात मी रमायला लागले, आणि घडायलाही लागले.

तिचं माझ्या आयुष्यात असलेलं अढळस्थान कधीच पुसल्या जाणार नाही कारण मी आज जी काही आहे ते फक्त तिच्यामुळेच आहे. आई ज्याप्रमाणे बाळाचं बोट धरून त्याला चालायला शिकवते अगदी त्याप्रमाणेच तिनी माझं बोट धरलं आणि मला चालायला शिकवलं. नुसतं चालायलाच नाही तर धावायलाही शिवकलं आणि त्यासाठी लागणारं पाठबळही दिलं.

प्रत्येकाला स्वताःत सामावून घेण्याची आणि तिच्यातलंच एक समजायला भाग पाडणारी तिची ही वृत्ती मला थक्क करून जाते. प्रत्येकात ती विभागली गेली असली तरी ती अखंड आहे. तिनी तिच्या मायेच्या ओळव्याने सगळ्यांना इतकं घट्ट धरून ठेवलंय की तिच्या विषयी बोलतांना आपसूकच तिच्याप्रती असलेलं अप्रूप आणि कौतुक चेहेऱ्यावर दिसतं.

बरं असं नाही की ती एकटीच आहे..फार मोठा गोतावळा तिचा! एवढी माणसं ती वर्षानुवर्ष जपत आली आहे..आणि आजही जपते आहे. तिच्यासोबत घालवलेल्या वर्षांमध्ये अशीच तिच्या सारखीच हिऱ्यासारखी माणसं मला भेटलीत आणि कायमची माझी झाली.

तिनी जशा मूर्त गोष्टी शिकवल्या आणि दिल्यात ना तशाच अमूर्त गोष्टीही दिल्यात...ज्या दाखवता येत नाही पण प्रत्येक वेळी जाणवतात मात्र!

कितीही काहीही झालं तरी जमिनीत आपली मुळं घट्ट रोवून तिचं उभं राहणं मला नकळत बरंच काही शिकवून जातं. संकटं कोणाच्या आयुष्यात येत नाहीत..पण ठामपणे त्याला तोंड देत सामोरं जाणं हे मी तिच्याकडनंच शिकले.

सुरुवातीला मी पळून जाऊ नये म्हणून ती माझं बोट धरून ठेवायची..पण नंतर मीच कधी तिचं बोट धरून चालायला लागले हे माझं मलाच कळलं नाही!

आणि आज चालता चालता ते धरलेलं तिचं बोट सोडण्याची वेळ आली आहे.. असं नाही की चालणंच थांबलंय..ते सुरूच राहणार आहे..पण आज मात्र ती तिच्या कर्तव्यातून मुक्त होणार आहे! हे असं असलं तरी आमचा संबंध कायमचं राहणार बरं एकमेकींशी! शेवटी जन्माचं नातं आहे आमचं!

ती कायमच माझ्यासाठी खूप खास राहणार, स्पेशल राहणार..

खरंतर ती प्रत्येकासाठी खूप खास असते! जशी ती मला भेटली ना तशीच ती तुम्हालाही भेटली असेल...नव्हे नव्हे भेटलीच आहे आणि मला खात्री आहे ती तुमच्याही साठी तितकीच खास असेल! तिच्याविषयी बोलतांना तुमचेही डोळे अश्रूंनी डबडबत असतील आणि कंठही दाटून येत असेल..

माझंही कित्येकदा असंच होतं तिच्याविषयी  बोलतांना आणि कदाचित पुढेही होईल..

कारण ती आहेच तशी - सर्वव्यापी, कर्तव्यनिष्ठ, जबाबदार, प्रेमळ, संस्कारक्षम,मातृतुल्य...

ती..माझी शाळा!

- कु. स्वर्णिमा प्रकाश

# "श" शाळेचा...!

या जगात अस्तित्वात असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तिचा असा दिवस असतो. तो म्हणजे जन्मदिवस अर्थातच वाढदिवस. आजच्या भाषेत सांगायचं झालं तर Birthday. तसा माझा वाढदिवस काही ठरलेला नाही. माझ्याबरोबरच बरेचदा माझ्या बहिणींचा पण वाढदिवस येतो. पाऊस आणि माझा वाढदिवस ठरलेला. तर आज मी तुमच्याशी संवाद साधणार आहे. तो पत्राच्या माध्यमातून. याच पत्रात मी माझी गोष्ट तुम्हाला सांगणार आहे

" खूप वर्ष झालीत माझा जन्म होऊन. आज माझा कितवा वाढदिवस आहे हे सुद्धा मला आठवणार नाही इतकं वय झालंय माझं. आज मी जिथे उभी आहे ना हीच ती जागा जिथे काही वर्षांपूर्वी मी दिमाखात उभी होती. तिथे याआधी काही म्हणजे काहीच नव्हतं. एक विशाल असं वडाचं झाड, दोन तीन आंब्याची झाडं आणि बाकी सगळीकडे फक्त अशोकाची झाडं. या अशोकाच्या झाडांच्या गर्दीत माझं अस्तित्व म्हणजे अगदी अशोकवनातल्या सीतेसारखं. उपेक्षित...! मोकळं रान होतं. त्या रानात शेजारच्या गावातली छोटी छोटी मुलं खेळायला यायची. तेव्हा अगदी मी लहान होते. माझ्या शरीराची पक्की बांधणी व्हायला अजून बराच अवकाश होता. उन्हाळ्यात माझं बांधकाम सुरू झालं. तेव्हा उष्णतेमुळे मला खूप तहान लागायची माझी तहान शमविण्यासाठी इथे काम करणारे लोकं सतत मला पाणी द्यायचे. हळूहळू उन्हाळा संपला आणि पावसाळ्यात मात्र माझी रोज अगदी न चुकता अंघोळ होऊ लागली. तुमच्या पेक्षा माझ्या आयुष्यात एक मात्र बरं होतं कारण मला आणि माझ्या आईला पावसाळा खूप आवडायचा. तुमच्यासारखं मला " ए आई, मला पावसात जाऊ दे" असं म्हणावं लागत नव्हतं. आम्ही दोघी मनसोक्त पावसात भिजायचो. आई तेव्हा हिरवाकंच शालू नेसायची. वेगवेगळ्या छोट्या छोट्या सुबक फुलांचा कशिदा तिच्या शालूवर असायचा.

मला आठवतंय आज पासून खूप वर्षांपूर्वी माझा पहिला वाढदिवस साजरा करण्याचं ठरलं. असं करत करत एक दिवस मला नवीन नवीन कपडे मिळाले माझा एक गणवेष तयार झाला.

कुठे लाल रंग कुठे पांढरा रंग आणि माझ्या डोक्यावर अगदी मुकुटाप्रमाणे शोभून दिसू लागलं ते माझं नाव ते म्हणजे "विद्यानिकेतन." किती छान ना? अगदी तुमचा होतो तसा माझा सुद्धा नामकरण विधी झाला. खूप लोक जमले होते. बऱ्याच मोठ्या लोकांनी भाषणं दिलीत. माझं महत्व सगळ्यांना समजावून सांगितलं. आपलं इतकं कौतुक होतंय हे बघून माझी मान अजूनच अभिमानाने उंचावली. हळूहळू छोटे छोटे सवंगडी मला मिळाले. रोज न चुकता ते माझ्याकडे यायला लागले. दगडी पाटीवर अ अननसाचा आ आईचा अशी बाराखडी गिरवायला लागले. आणि बाराखडी शिकता शिकता "श" शाळेचा हे सुद्धा ते शिकले. माझ्या या घरात इतकी माणसं रोज ये जा करायची याचा मला प्रचंड आनंद व्हायचा. यामुळेच मला नवीन सवंगडी मिळाले. माझ्या आईच्या कुशीत माझे सवंगडी तासनतास खेळायचे. मातीशी त्यांची नाळ जोडलेली असावी हा त्यामागचा उद्देश.

वाचनालय, प्रयोगशाळा, वेगवेगळे वर्ग अशी खूप दालनं होती माझ्या घराला. इथे येणारा प्रत्येक विद्यार्थी हा ज्ञानी व्हावा विद्वान व्हावा असं मला कायम वाटतं. दरवर्षी होणारं स्नेहसंमेलन म्हणजे जणू उत्सवच. कधी संगीताचे सूर तर कधी नृत्याचा ठेका हा नाद मला मुग्ध करायचा. वाचनालयात असलेली ग्रंथसंपदा आणि देवी सरस्वती ही माझी आराध्य दैवतं. इथे येणाऱ्या प्रत्येक शिक्षकाशी विद्यार्थ्यांशी माझं एक सुंदर नातं निर्माण तर झालंच पण त्याही पेक्षा आनंद याचा की व्यक्तिच्या सर्वांगीण विकासात माझा सुद्धा सिंहाचा वाटा आहे. याचा विशेष आनंद. माझ्या वास्तूत ज्ञानाचा गंध आहे. विद्येचं अधिष्ठान आहे. आभाळचं छत आणि धरणीचा आधार या दोन खांबांवर माझं अस्तित्व आजही अगदी कोणालाही हेवा वाटावं असं आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या की हीच माझी वास्तू मला खायला उठायची. रोजची असलेली रेलचेल अचानक बंद झाली की माझं मन आजही विषण्ण होतं.

“मी तुझ्यापेक्षा चार पावसाळे जास्त पाहिले आहेत हं!” असं कोणी बोललं की मला मजा वाटते. माझ्या या भव्य वास्तूतच आज फार मोठी झालेली माणसं कधीतरी अक्षरं गिरवून मोठी झाली हे कळलं की ऊर भरून येतो माझा. आपल्या देशातील शास्त्रज्ञ म्हणा विचारवंत म्हणा ही सगळी मंडळी माझ्याच अंगाखांद्यावर मोठी झाली. त्यांना देशासाठी काम करतांना बघून मला “आई” म्हणवून घेण्याचा आनंद होतो.

गणितातातल्या अंकांची आकडेमोड, कविता विश्वाची सफर, आपला अभिमान असलेला इतिहास, देववाणी संस्कृत, राष्ट्रभाषा हिंदी, रसायन भौतिक आणि जीव शास्त्राचं विज्ञान, माझ्या आईच्या विविधांगी पैलूंचा आढावा घेणारा भूगोल, अर्थाचं महत्व सांगणारं अर्थशास्त्र, आपल्या हक्कांची माहिती देणारं नागरिकशास्त्र, परकीय भाषांचं ज्ञान, संगीतातल्या सात सुरांची एक सुरेल सफर, त्याला असलेली एक विशिष्ट लय ताल आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला मनसोक्त खेळू देणारं त्यातला खेळाडू जागा ठेवणारं क्रीडांगण ही सगळी सगळी माझी बलस्थानं आहेत याचा तर गर्व आहे मलां.

तुमच्या प्रमाणे मला पण आता खूप कंटाळा आलाय हो या परिस्थितीचा. माझं घर गेली वर्षभर तसंच भकास आहे. मी रोज वाट बघत असते की कोणीतरी येईल आणि माझ्या घराचं कुलूप काढेल झोकून देईल स्वतःला माझ्या आवारात. ज्ञानार्जन करेल आणि खूप यशस्वी होईल. आणि असे खूप मानाचे तुरे माझ्या शिरपेचात मला खोचायला मिळतील. पण मला आशा आहे की हे सगळं लवकरच सुरु होईल. तुमची खूप वाट बघतेय मी...! फार बोलत नाही आता इथेच थांबते भेटूया लवकरच....!

तुमचीच लाडकी शाळा

"विद्यानिकेतन"

- सौ सायली अक्षय देशपांडे

# शाळा- व्यक्तिमत्त्व विकासाचे घर

असं म्हणतात की बाळाला घडवायचं असेल तर ते ९ महिन्यात घडवणं शक्य आहे.

अगदी तसच एक आई आपल्या बाळाला गर्भात असताना संस्कार देत असते . ती त्या बाळाचं व्यक्तिमत्त्व कस असावं याचा विचार करून त्याच्यावर संस्कार करत असते...आणि बाळ जन्माला आल्यावर अगदी त्याच रीतीनं वागू लागतं, बोलू लागतं, विचार करू लागतो जे त्यानं ९ महिने आईच्या गर्भात असताना अनुभवलंय!

अविस्मरणीय आणि अपूर्व असा तो प्रवास आई साठीही असतो आणि त्या बाळासाठीही !

हल्ली तर प्रवास अधिक सुरेख होण्यासाठी गर्भसंस्कार शिबिर सुद्धा घेतल्या जातात. बाळाची जडणघडण सुसंस्कृत होण्यासाठी आणि त्यानंतर जन्म झाल्यानंतर ३ वर्षांचं झाल्यावर त्याला अधिक सुसंस्कृत बनवण्याची जबाबदारी येते ती त्याच्या बाहेरील जगावर...!

घरात लहान बाळ येणार असलं की, त्याची तयारी घरातील प्रत्येक जण आपापल्या परीनं करू लागतो. आईवडिलांचा आनंद तर या काळात गगनी मावत नसतो. 'बाळ येणार' हा आनंद एका बाजूला आणि येणाऱ्या बाळाला एक चांगली व्यक्ती म्हणून घडवायच्या जबाबदारीचा ताण एका बाजूला .

जसं बाळाचं शरीर निरोगी आणि सुदृढ राहावं म्हणून ते प्रयत्न करत असतात, तसच ते बाळावर गर्भातच संस्कार करण्यासाठी प्रयत्न करत असतात. शास्त्राप्रमाणे गर्भातच बाळाच्या मेंदूचा ५०% विकास झालेला असतो तर उर्वरित विकास हा भौतिक तसेच सामाजिक वातावरणावर अवलंबून असतो .

शालेय शिक्षणामुळे या उर्वरित विकासाची वाढ होणं अगदीच सोप्पं व्हायला लागतं. आणि पुढील प्रक्रियेला सुरुवात होते... शाळेला सुरुवात होते... सर्वप्रथम 'बालवाडी' या एका सुंदर टप्प्याला सुरुवात होते. आईनं काय संस्कार दिलेत हे या बालवाडीतच दिसून येतं ! आणि सुरुवात होते ती 'मोठं होऊन काय व्हायचं?' या प्रक्रियेला म्हणजेच तुमच्या आमच्या भाषेत शिक्षणाला...!

मला आठवते ती माझी शाळा...

सुरुवातीला आपल्या सारखी अनेक अनोळखी मुलं वर्गात एकत्र येऊन बसतात. आपल्याच आईसारखी एक गुणी, सज्जन आणि प्रेमाचा बहर आलेल्या व्यक्तीला भेटण्याची हीच ती वेळ असते, अर्थात आमच्या वेळेला आम्ही त्या व्यक्तीला ‘बाई’ म्हणून हाक मारायचो. जी आपल्याला आपल्याच आई सारखी सांभाळून घ्यायची, तर अश्या ‘बाई’ आपल्याला छान छान गोष्टी सांगतात, सुविचार सांगतात, चांगल्या सवयी लावतात. आईशिवाय या बालवाडीत ३ तास तर जायचेच, आणि याच काळात आपण आपल्या हातून कसं  जेवायचं हे सुद्धा शिकवल्या जायचं, एकंदर काय तर घराव्यातिरिक्त ‘हे बाळ’ बाहेरच्या जगासाठी शहाणं व्हायला तयार होत असतं. हळूहळू या ‘बालवाडीत’ आपल्याला रोज जायचंय. आपल्या आई बाबांना सोडून दिवसातील ३ तास आपल्या मित्र मैत्रिणींसोबत आणि आईसारख्या एका प्रिय व्यक्तीसोबत घालवायचे आहेत, हे उमगायला लागतं. सुरुवातीला जरी रडण्यात काही दिवस गेले असतील पण आता मात्र ते सुखावह होऊ लागतात, आवडायला लागतात...!

हळू हळू बालवाडीतून इयत्ता पहिलीत, पहिलीतून इयत्ता दुसरीत असा गोड प्रवास सुरु होतो. आपली मातृभाषा, घरी बोलल्या जाणारे शब्द खऱ्या अर्थाने दिसतात कसे ? त्यांना लिहिल्या कसं जातं ? याची ओळख व्हायला लागते. आई ही जितकी सुंदर आहे, ती अक्षरात गुंफल्यावर कशी लिहिल्या जाते, याचा अभ्यास सुरु होतो... आईनंतर आपलं हित बघणारे शिक्षकवृंदच असतात, असं मला वाटतं...

शाळेत रोज जायची आवड निर्माण होऊ शकते, ती एका शिक्षकामुळेच !

शाळा ही आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक बनत जाते. कालांतराने शाळा ही जणू काही आपलं घरच, असं विद्यार्थ्यांना वाटू लागतं. घराप्रमाणेच शाळेत देखील शिस्तीचं महत्त्व असतं, तसंच आपल्या आयुष्यात आपल्या अंगी शिस्त असेल तरच ती शिस्त अंगवळणी पडत जाते. आयुष्यात शिस्तीचं फार महत्त्व आहे हे आपल्या सर्वांना ठाऊकच आहे, आणि ती शिस्त बळकट करण्यासाठी एक शिक्षकच कारणीभूत असतो.

भारतीय संस्कृतीनुसार गर्भात असतानाच बाळाला चांगलं शिक्षण देणं गरजेचं असतं. जसं “महाभारतामध्ये अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू याने देखील आईच्या गर्भातच चक्रव्यूह भेदण्याची कला अवगत केली होती, तसंच सुजाण आणि सुशिक्षित नागरिक निर्माण करण्याचं काम शिक्षकाचं असत.

इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत आपली मातृभाषेशी जवळीक निर्माण करण्याचं आणि आपलं आपल्या व्यक्तिमत्त्वाशी ओळख करून देण्याचं काम शिक्षकवृंद करीत असतात .

मला आठवतं माझ्या मातृभाषेवर प्रेम करायला शिकवलं ते माझ्या वर्ग शिक्षिकेनेच! आजही मी माझ्या मातृभाषेची ऋणी आहे आणि निरंतर असेल.

ज्याप्रमाणे कुंभार ओल्या मातीला आकार देऊन मातीची सुंदर व बळकट भांडी बनवतो त्याचप्रमाणे शिक्षक देखील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचं काम करीत असतात.

इयत्ता पाचवी ते दहावी या दरम्यान शिक्षक विद्यार्थ्यांचा सामाजिक, भौतिक, सांस्कृतिक, मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक विकास करण्याचं काम करत असतात.

सामाजिक दृष्टीकोनातून एका उत्कृष्ट व्यक्तिमत्त्वाची निर्मिती कशी करावी हे ‘शाळा’ आपल्याला शिकवत असते.

आईकडून मिळालेल्या गर्भसंस्कारांना जन्माला आल्यानंतर वास्तविकतेत कसे जोपासावे , त्यांना वळण कसे द्यावे, हे शिकवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षक.

व्यक्तिमत्त्व विकासाचे घर म्हणजेच आपल्या शाश्वत जीवनाची पाठशाळा हीच आपली शाळा.

- सौ. अपूर्वा भालेराव

# समारोप

रसिकहो या महिन्याच्या अंकापासून पुढील सगळ्या अंकांमध्ये आपण वेगवेगळ्या लेखिकांना यात सामावून घेणार आहोत.नवोदित आणि साहित्याची आवड असलेल्या “ती” चं हे हक्काचं पान असेल. प्रत्येक स्त्री मध्ये कुठेतरी एक लेखिका असते. लेखिका नसली तरी एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची तिच्यात कला असते. ती उत्तम निवेदिका असते. तिच्यात हे सगळे गुण असतात फक्त ते कधी कधी सुप्त राहून जातात त्या गुणांना या माध्यमातून जागृत करण्याचा हा प्रयत्न.

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण  नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

आमचे आधीचे प्रकाशित अंक :

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

- सौ. सायली अक्षय देशपांडे

रम्य ते दिवस,  रम्य ती आठवण

शाळेच्या दिवसांची मनात परत साठवण

ही शाळेची सफर आपल्याला आवडली असेल अशी आम्ही आशा करतो..!

आपल्याला  जर अंक आवडला असेल तर  कृपया आपले अमूल्य मत  आम्हाला नक्की कळवा, खाली अभिप्रायासाठी लिंक देत आहोत..

## अभिप्राय